सकाळ

# ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनलमध्ये सायबर सुरक्षा कार्यशाळा

**औसा :** आलमला येथील ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'सायबर सुरक्षा कार्यशाळा' आयोजित करण्यात आली होती. प्राचार्या स्वाती कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यशाळेचे आयोजन राजश्री शाहू महाविद्यालय आणि क्विकहिल फाऊंडेशनच्या सहकार्याने करण्यात आले. कार्यशाळेत शाहू महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागाच्या विद्यार्थिनी राजकन्या राजमाने आणि श्रावणी लगडे यांनी सोशल मीडियाचा अयोग्य व अतिवापर कसा घातक ठरतो यासंदर्भात मार्गदर्शन केले. तसेच डिजिटल फसवणुकीपासून सावधानता, सायबर गुन्हा नोंदणी व हेल्पलाईनबाबतही माहिती दिली.

Aurangabad, Latur-Today
19/08/2025 Page No. 3